पुणे महानगरपालिका
विधी समिती
कार्यपत्रिका क्रं.८

विधी समितीची पाक्षिक सभा गुरुवार,दि. २०/८/०९ रोजी दुपारी ४ : ०० (चार)

वाजता समितीच्या सभागृहात भरेल.

सदर सभेत खालील विषयाचा विचार होईल.

विषय क्रं.१४

मा.ज्ञानेश्वर शिंदे व मा. सुनिल उर्फ बंडू गायकवाड यांचे दि. १३/८/०९ चे पत्र.

पुणे मनपा सभा ठराव क्र.७१४,दि.२१.२.८६ अन्वये नागरवस्ती विकास योजना विभागाकडील प्रकल्प संचालक या पदाची शैक्षणिक पात्रता व गुणवत्ता खालील प्रमाणे निश्चित करण्यात आली होती.

१) मान्यताप्राप्त विद्यापीठाची मास्टर ऑफ सोशल वर्क ही पदवी पहिल्या श्रेणीत उत्तीर्ण.

२) अर्बन कम्युनिटी डेव्हलपमेंट प्रोजेक्ट मध्ये प्रकल्प अधिकारी म्हणून दोन वर्ष अनुभव अशी आहे.

नागरवस्ती विकास योजनेकडील प्रकल्प अधिकारी हे पद गेली दोन वर्षे रिक्त असल्याने सदर पदाची जबाबदारीची कामे सध्या उपप्रकल्प अधिकारी हे करीत आहेत.

वरील बाब लक्षात घेता नागरवस्ती विकास विभागाकडे गेल्या १५ ते २० वर्षे काम करीत असलेले अनुभवी सेवक /अधिकारी यांना प्रकल्प संचालक या पदावर काम करण्याची संधी मिळणेसाठी खालीलप्रमाणे शैक्षणिक पात्रता व अनुभवामध्ये शिथिलता देण्यास मान्यता द्यावी,ही विनंती.

१) मान्यताप्राप्त विद्यापीठाची मास्टर ऑफ सोशल वर्क ही पदवी पहिल्या किंवा व्दितीय श्रेणीत उत्तीर्ण असणे आवश्यक .

२) नागरवस्ती विकास योजना विभागाकडील वस्ती विकास या कामाचा किमान १० वर्षाचा अनुभव व उप प्रकल्प अधिकारी म्हणून एक वर्ष अनुभव आवश्यक.

नगरसचिव,
पुणे महानगरपालिका.